पुण्य नगरी

# लोणावळ्यात पर्यटकांना स्वसंरक्षणाचे धडे

## राजमाची किल्ल्याजवळ प्रशिक्षणाची सुविधा



लोणावळा : प्रतिनिधी

प्रसिद्ध डिझायनर, उद्योजक जिमी मिस्त्री यांच्या संकल्पनेतून निसर्गाच्या सानिध्यात आकाराला आलेली पंचतारांकित ॲकॅडमी आजकाल दहशतवादी हल्ले कधी आणि कुठे होतील याचा काही नेम नाही. त्यामुळे कायम सतर्क राहणे ही काळाचीच गरज आहे. हीच गरज ओळखून डेला समूहाचे प्रमुख जिमी मिस्त्री यांनी राजमाची किल्ल्याजवळ उदेवाडी येथे शिरोता धरणाच्या काठावर तीन एकराच्या परिसरात डेटाच्या रूपाने या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पंचतारांकित रिसॉर्टच्या वातावरणात त्याची सांगड घातल्याने पर्यटकांसाठी ही आगळीवेगळी संधी आहे. रिसॉर्ट, व्हिलाज आणि ॲडव्हेंचर पार्कच्या क्षेत्रामध्ये आपले पाय घट्ट रोवलेल्या या उद्योगाने ही ॲकॅडमी स्थापन करून राष्ट्रप्रेमाचे एक आदर्श उदाहरण घालून दिले आहे.

२६/११ ला मुंबईतील दहशतवादी हल्ल्यात शेकडो निरपराध लोक शहीद झाले. त्यामुळे व्यथित झालेले जिमी मिस्त्री यांनी या घटनेचा सूड म्हणून अशी सुविधा निर्माण करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. हा तरुण उद्योजक स्वतः प्रखर राष्ट्रभक्त असून, प्रत्येकामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जागी करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे.

येथील प्रशिक्षण अधिक परिणामकारक आणि शास्त्रशुद्ध होण्याचे मुख्य कारण म्हणजे इथे उभी केलेली लष्करातील निवृत्त अधिकाऱ्यांची भक्कम फळी. लष्कराच्या सदर्न कमांडचे माजी प्रमुख निवृत्त लेफ्टनंट जनरल रेमंड नऱ्होना यांच्या नेतृत्वाखाली जवानांची तरुण तुकडी येथे प्रशिक्षण देते. प्रत्यक्ष दहशतवाद्यांचा खात्मा करणारे ब्लॅक कॅट कमांडो देखील या तुकडीत आहेत.

दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी वा अन्य काही कारणाने उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत संकटाला घाबरून न जाता त्यातून आपला बचाव कसा करायचा याचे तंत्र येथे शिकविले जाते.

तोल सांभाळत पाइपवरून चालणे, भिंत ओलांडणे, क्रॉलिंग करत पुढे सरकने असे १९ प्रकारचे अडथळे पार करण्याचे प्रशिक्षण येथे दिले जाते.